// विपश्यना //

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

**बुद्धवर्ष २५५७, पौष पौर्णिमा, १६ जानेवारी, २०१४ वर्ष २ अंक ११**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**उट्ठानकालम्हि अनुट्ठहानो, युवा बली आलसियं उपेतो।**
**संसन्नसङ्कप्पमनो कुसीतो, पञ्ञाय मग्गं अलसो न विन्दति॥**

*धम्मपद- २८०, मग्गवग्गो.*

जो परिश्रम करण्याच्या वेळी परिश्रम करीत नाही, तरूण व बलशाली असूनही आळस करतो, मन संकल्प पूर्ण करीत नाही, अशा आळशी व्यक्तीला प्रज्ञेचा मार्ग प्राप्त होत नाही.

# आंतरिक शांतीचे धर्मदूत : श्री सत्यनारायणजी गोयन्का

*(मागील अंकाचा पुढील भाग ...३ ...)*

## भारतातून विश्वात

योग्य वेळ आली आहे, असे श्री गोयन्कजींना वाटले. प्राचीन भविष्यवाणी होती की म्यमांतून धर्म भारतात परतेल. ही भविष्यवाणी तर खरी झाली होती. परंतु भविष्यवाणी हीसुद्धा होती की धम्म भारतातून संपूर्ण विश्वात पसरेल. ही भविष्यवाणी पूर्ण व्हायची होती.

ह्या कार्याला पूर्ण करण्यासाठी गोयन्काजींना भारतातून अन्य देशात जाणे आवश्यक होते. परंतु गोयन्काजींजवळ जो बर्मी पासपोर्ट होता तो फक्त भारतासाठी होता. त्यांनी खूप प्रयत्न केला,परंतु इतर देशात जाण्याची परवानगी मिळाली नव्हती. इच्छा नसतांनाही त्याना नागरिकता बदलावी लागली आणि भारतीय पासपोर्टसाठी आवेदन द्यावे लागले. ह्या प्रकारे त्यांना मातृभूमीशी पुन्हा नाते तोडावे लागले, परंतु विश्वाचे धर्मदूत बनण्यासाठी हे आवश्यक होते.

त्यांना हे जाणून आश्चर्य वाटले की भारतीय नागरिक बनणे व नवीन पासपोर्ट मिळवणेही इतके सोपे नव्हते. प्रथम गुप्तचरांनी माहिती काढली की गोयन्काजी धम्मगिरीत काय करतात. प्रत्येक बाबीत उशीर होत होता. परंतु शेवटी सर्व बाधा दूर झाल्या आणि गोयन्काजी व माताजी पॅरिसला जाण्यासाठी विमानात चढले. म्यमांतून भारतात येण्याच्या दहा वर्षानंतरच ते येथून विदेशात गेले.

फ्रांसमध्ये त्या वर्षी श्री गोयन्कजींनी दोन शिबिर संचालित केली. ह्यानंतर कॅनडामध्ये एक व युनाईटेड किंगडममध्ये दोन शिबिर संचालित केली. मोठ्या संख्येने जुने साधक आले. तसेच ज्यांनी पूर्वी विपश्यना केली नव्हती असेही बरेच लोक होते. ह्यानंतर हिवाळ्यात काही लोक धम्मगिरीत आले. वीस वर्षांपर्यंत हा क्रम सुरू राहिला. ह्या दरम्यान प्रत्येक वर्षी श्री गोयन्काजी भारतातून बाहेर जात राहिले. केवळ युरोप व उत्तर अमेरिकेतच गेले नाहीत, तर जपान, ताईवान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलॅड, श्रीलंका, थाईलॅड इत्यादी अनेक देशात गेले व शेवटी ते १९९० मध्ये पहिल्यांदा आपली मातृभूमी म्यमांत परतू शकले. हळू हळू ह्या देशात तसेच इतर देशातही विपश्यनेची केंद्र उघडली. सर्व जागी विपश्यना शिकण्याची व तिचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली, तशीच जसे श्री गोयन्काजी शिकवितात. त्याच नियमांनुसार सर्वत्र विपश्यना शिकवली जावू लागली

## एक नवा केंद्र बिंदू

श्री गोयन्काजींच्या मिशनची खूप प्रगती झाली होती, परंतु



*(श्री सत्यनारायणजी गोयन्का, जानेवारी ३०, १९२४- सप्टेंबर २९, २०१३)*

*सन २०१२ मध्ये श्री गोयन्काजींनी विश्वाच्या सर्व विपश्यना केंद्रांवर आपल्या उत्तराधिकारीच्या रूपाने ज्यांना निवडले होते, त्यांचे नाव दिले होते. (डिसेंबर २०१२ मध्ये ह्याची सूची प्रकाशित झाली होती.) प्रत्येक क्षेत्रात सहायक आचार्य परिषदेचे सदस्याच्या रूपाने आम्ही सर्व सोबत काम करत राहू आणि अन्य सहायक आचार्यांना सहयोग करीत राहू. विपश्यनेची शिबिर पूर्वीप्रमाणेच आयोजित केली जातील. आणि धर्माचे चक्र बहुजनांच्या हितासाठी, बहुजनांच्या सुखासाठी सतत चालत राहील.*

आता त्यांच्या समोर एक नवी समस्या होती की विपश्यना शिकू इच्छिणाऱ्या लोकांच्या इतक्या मोठ्या संख्येला ते कसे शिकवू शकतील? आतापर्यंत ते एकटेच शिकवायचे. मोठ्या शिबिरातही त्यांची एक सीमा होती. अमुक संख्येच्या साधकांनाच व्यक्तिगत रूपाने निर्देशित करू शकत होते. एकच उत्तर होते की शिकविणाऱ्यांची संख्या वाढवावी. त्यामुळे सन १९८१ च्या शेवटी त्यांनी आपल्या प्रतिनिधीच्या रूपाने जुन्या पक्व झालेल्या साधकांना प्रशिक्षण देऊन त्यांना सहायक आचार्यांच्या रूपाने नियुक्त करणे आरंभ केले. त्यांना म्हटले गेले की त्यांनी श्री गोयन्कजींच्या रेकॉर्डेड निर्देशानुसार आणि प्रवचनांनुसार शिबिर संचालित करावे. हे योग्यच होते की एका सहायक आचार्याद्वारे पहिले शिबिर यात्री अतिथिनिवास, बर्मीज विहार, बोधगया येथे संचालित केले गेले, जेथे श्री गोयन्काजी खूप काळ राहिले होते. ह्या प्रकारे काही महिन्यातच पूर्ण विश्वात शिबिर संचालित केले जाऊ लागले. आज १२०० पेक्षा



*(गेड्रयॉ, फ्रांसच्या पहिल्या शिबिराच्या समाप्तीवर साधकांसोबत १९८८)*

जास्त सहायक आचार्य आहेत जे प्रत्येक वर्षी जवळपास २५०० पेक्षा जास्त शिबिरांचे संचालन करतात, जेथे जवळपास १५०,००० लोक १६० पेक्षा जास्त स्थायी केंद्रात व अस्थायी केंद्रात विपश्यना शिकण्यासाठी येतात. सन १९९४ पासून श्री गोयन्काजींनी खूप अनुभवी सहायक आचार्यांना आचार्याच्या रूपाने नियुक्त केले. पूर्ण विश्वात जवळपास ३०० आचार्य आहेत जे संपूर्ण विश्वाच्या विपश्यना केंद्रांचे व अन्य विपश्यना शिबिरांच्या कार्यक्रमांना निर्देशित करतात.

सहायक आचार्यांच्या नियुक्तीमुळे श्री गोयन्काजी इतर मोठ्या योजनांवर लक्ष केंद्रित करू शकले. त्यानी आता आपला अधिक वेळ सार्वजनिक भाषण देण्यात व इतर प्रसंगी भाषण देण्यात लावला. जसे सन २००० मध्ये विश्व आर्थिक मंच, डावोस, स्वीटझर लॅड आणि ऑगस्ट २००० मध्ये विश्व शांती संमेलन, संयुक्त राष्ट्र परिषदेत भाषण देऊन लोकांना चकित केले. त्यांनी 'विपश्यना विशोधन विन्यासची' स्थापना केली. येथे पाली भाषेत असणाऱ्या बुद्धांच्या उपदेशांचे सारे प्राचीन ग्रंथ देवनागरी लिपीत तसेच इतर काही लिपीतही प्रकाशित करविले, तसेच विभिन्न लिपीत त्यांची सीडी बनवून लोकांना मोफत उपलब्ध करविली. दिल्लीच्या तिहार तुरुंगात व अन्य सुधार गृहात सतत संचालित विपश्यना शिबिरामुळे तेथील कैद्यात तसेच इतर लोकांच्यात काय काय सुधारणा झाल्या ह्याचेही निरीक्षण करीत राहिले. एप्रिल १९९४ मध्ये तर त्यांनी १००० कैद्यांचे शिबिर संचालित केले. त्यांनी बालशिबिराचा कार्यक्रमही आरंभ केला. त्यांनी विपश्यना व बुद्धांच्या शिकवणुकीवर विस्ताराने लिहीले. मुंबईजवळ 'ग्लोबल विपश्यना पॅगोड्याच्या' निर्माणासाठी लोकांना प्रेरित केले. स्वेडेगोन पॅगोड्याची प्रतिकृती असणाऱ्या ह्या पॅगोड्याचे निर्माण ह्यासाठी केले गेले की हा खूप लोकांना बुद्धांच्या शिकवणुकीकडे आकर्षित करू शकेल. हा म्यमां व सयाजींच्या प्रती कृतज्ञता दर्शविण्याचेही प्रतीक आहे, कारण म्यमां व सयाजींनी विपश्यनेचे दान भारताला परत केले.

जशी जशी वर्षे संपत गेली तसे तसे गोयन्काजींना सन्मान व पुरस्कार मिळत गेले. त्यांना 'विद्या वारिधि', 'वर्णकीर्ती', 'धम्ममूर्ती', 'महासद्धम्मज्योतिर्धज', 'महाउपासक विश्व विपश्यनाचार्य' इत्यादी धर्माच्या अनेक पदव्या मिळत गेल्या. म्यमां व श्रीलंका सरकारने त्यांना सरकारी अतिथीच्या रूपाने आमंत्रित केले आणि पदव्या प्रदान केल्या. सन २०११ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण (भारत सरकारचा एक सर्वोच्च नागरिक सन्मान) ने सन्मानित केले. श्री गोयन्काजी सतत हे म्हणत राहिले की हे सर्व सन्मान आणि पदव्या वस्तुतः'धम्मासाठी' दिल्या गेल्या आहेत.


## जीवनाची काही अंतिम वर्ष

जीवनाच्या अंतिम वर्षात गोयन्काजींचे स्वास्थ्य चांगले नव्हते. ते व्हील चेयरवर बसायचे, त्यांचा गंभीर आवाज दुर्बळ झाला होता, जास्त बोलणे कठीण झाले होते. जरी ते वृद्धत्व आणि रोगाच्या दुःखांना सहन करीत असत, तरी त्यांनी काम करणे सोडले नव्हते. जोपर्यंत शक्य होते तोपर्यंत आपल्या शक्तीनुसार ते धर्म शिकवित राहिले आणि इतरांना ह्याच्या अभ्यासासाठी प्रेरित करीत राहिले.

जशी जशी त्यांची प्रसिद्धी वाढली, तसा तसा त्यांचा सन्मानही वाढला. लोक त्यांना खूप सन्मान देऊ लागले होते आणि काही लोक त्यांना पारंपारिक भारतीय गुरूच्या रूपात पाहात होते, जरी ह्या भूमिकेशी त्यांचे काहीही घेण-देणे नव्हते. जेव्हा ते ग्लोबल पॅगोड्याला यायचे तेव्हा लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या चरणांना स्पर्श करण्यासाठी यायच्या, जणू त्यांच्याजवळ लोकांना काही देण्याची जादूची शक्ती होती. लोकाच्या ह्या व्यवहारामुळे ते खिन्न व्हायचे, कारण धर्मदूताच्या त्यांच्या कामाशी ह्याचा काहीही संबंध नव्हता. न्यूयार्कमध्ये सन २००२ मध्ये सार्वजनिक व्याख्यान दिल्यानंतर ते म्हणाले होते, मी एक सामान्य मनुष्य आहे. भारतात शिक्षकाला 'गुरुजी' म्हटले जाते आणि श्री गोयन्काजींचे काही शिष्य त्यांना प्रेमाने गुरुजी म्हणायचे. परंतु ते म्हणायचे की जर त्यांना कोणत्या नावाने संबोधित करावयाचे असेल, तर त्यांना पाली भाषेत प्रयुक्त 'कल्याणमित्र' म्हटले जाणे आवडेल. ज्याचा अर्थ आहे कल्याण इच्छिणारा मित्र.

ते आपल्या शिष्यांना फोटो घेण्यापासून थांबवू शकले नाहीत, तरीही ते जेव्हा कॅमेरा त्यांच्याकडे करीत तेव्हा श्री गोयन्काजी त्यांना हे म्हणून चिडवीत असत की माझे खूपसे फोटो तुमच्याकडे नाहीत काय?

ते आपल्या फोटोबाबत गंमत तर करायचे, परंतु त्यांनी साधना कक्षात अथवा विपश्यना केंद्रांच्या सार्वजनिक स्थानांवर स्वतःचे फोटो लावण्याची परवानगी दिली नाही. जेव्हा विचारले जायचे की त्यांना बोधी प्राप्त झाली आहे काय तेव्हा त्यांचे उत्तर असायचे की जितके-जितके मी माझ्या मनाला क्रोध, घृणा आणि द्वेषापासून मुक्त केले, तितकी-तितकी मी बोधी प्राप्त केली आहे. त्यांनी हा कधीही दावा केला नाही की त्यांना काही विशेष अवस्था प्राप्त झाली आहे. जास्तीत जास्त ते हळूच म्हणायचे,''फक्त मी त्या लोकांपेक्षा मार्गावर थोडा जास्त चाललो आहे, जे आता माझ्याजवळ धर्म शिकण्यासाठी आलेले आहेत''. शिबिराच्या शेवटी पुष्कळसे साधक त्यांना धन्यवाद देण्यासाठी यायचे. तेव्हा ते नेहमी म्हणायचे,'' मी तर फक्त एक



*('ग्लोबल विपश्यना पॅगोडा,' गोराई, मुंबई)*



*(धम्मधरा विपश्यना केंद्र, अमेरिकेच्या परिसरात मंगल मैत्री पाठ करतांना, पूज्य गुरुदेव व माताजी १९८० च्या दशकामध्ये)*

माध्यम आहे, धर्माला धन्यवाद द्या आणि स्वतःलाही कठोर परिश्रम केले त्यासाठी धन्यवाद द्या''.

सन २०१० मध्ये त्यांनी म्हटले ज्या व्यक्तीने धर्म येथे आणला त्यापेक्षा जास्त महत्वपूर्ण त्याला पाठविणारे सयाजी ऊ बा खिन आहेत. खूप पूर्वी सम्राट अशोकद्वारे भारताच्या शेजारील देशात पाठविलेल्या धर्मदूतांनी धर्म तिथे नेला, त्यांची नावे लोक विसरले परंतु सम्राट अशोकाचे नाही. म्हणून बुद्ध शासनाच्या ह्या नव्या युगात लोकांनी सयाजी ऊ बा खिनांची अवश्य आठवण ठेवावी. लोक त्यांची आठवण ठेवोत अथवा न ठेवोत, त्यांनी ह्याची पर्वा केली नाही.

तरीही श्री गोयन्काजींना जाणणारे लोक त्यांना कधीही विसरू शकणार नाहीत.

खूप पूर्वी सयाजी ऊ बा खिनांनी म्हटले होते "विपश्यनेचा डंका आता वाजला आहे." विश्वात पुष्कळशा लोकांना धर्माचा संदेश देणारे श्री सत्यनारायणजी गोयन्का होते. त्या लोकांसाठी श्री गोयन्काजी धर्माचे यक्ष प्रतीक होते जसे प्रज्ञा, विनम्रता, करुणा, निस्वार्थता व उपेक्षा अथवा समतेचे. ते नेहमी धर्मरसाच्या गोष्टी करायचे. हॉलमधून बाहेर जातांना' सर्वांचे मंगल होवो', 'सर्वांचे मंगल होवो', म्हणत ते बाहेर जायचे. त्यांच्या गोड आवाजाप्रमाणेच त्यांचे मधुर व्यक्तित्वही नेहमीसाठी लक्षात राहील.

## किल्ल्यांचा गुच्छा

ही गोष्ट श्री गोयन्काजी दहा दिवसीय शिबिराच्या समारोप प्रवचनात सांगतात-

एक म्हातारा होता, तो खूप श्रीमंत होता. त्याची पत्नी मरण पावल्यामुळे तो विधुर झाला. आपल्या इथे तर पत्नीच गृहलक्ष्मी. घरात जे अन्न-धन भांडार, त्याच्या किल्ल्या तर तिच्याजवळ राहायच्या. आता तर ती मरण पावली होती. हा किल्ल्यांचा गुच्छा कोणाला द्यावा? संयुक्त परिवार होता. त्याला चार मुलगे व चार सूना होत्या. तो प्रत्येकीला तर किल्ल्यांचा गुच्छा देऊ शकत नव्हता. त्याला कोणीतरी एकीला निवडायचे होते. त्याने चौघींना बोलावले व म्हटले- 'मी तुमची परीक्षा घेईन. किल्ल्यांचा गुच्छा मी तिला देईन जी सर्वात जास्त अंक प्राप्त करेल.'

काय परीक्षा घेऊ या? त्याने प्रत्येक सूनेला धान्याचे पाच दाणे दिले आणि म्हटले' मी चार वर्षांनंतर येईन. तुम्हाला हे पाच दाणे सुरक्षित ठेवायचे आहेत. अरे, जी पाच दाण्यांना सुरक्षित ठेवू शकत नाही, ती इतके मोठे अन्न-धन भांडार कसे सांभाळेल? हीच तुमची परीक्षा आहे'. असे म्हणून म्हातारा निघून गेला.

सर्वात मोठ्या सूनेने विचार केला, म्हातारा वेडा झाला आहे. चार वर्ष? ह्या पाच दाण्यांना चार वर्षांपर्यंत सुरक्षित ठेवण्याची चिंता मी का करू? चांगले होईल, मी यांना फेकून देईन. जेव्हा म्हातारा येईल, तेव्हा मी भांडारातून पाच दाणे काढून त्याच्यासमोर हे म्हणून ठेवीन की' घ्या, तुमचे पाच दाणे'. असा विचार करून तिने पाच दाण्यांना फेकून दिले.

दुस-या सूनेने विचार केला बरोबर आहे, चार वर्षांपर्यंत ह्या पाच दाण्यांना सुरक्षित ठेवण्याची चिंता करणे व्यर्थ आहे.परंतु म्हातारा खूप अनुभवी आहे,खूप चतूर आहे. त्याला जीवनभरचा अनुभव आहे. कोण जाणे कदाचित ह्या पाच दाण्यात काही आश्चर्यजनक जादूची आणि चमत्कारिक शक्ती असेल.चार वर्षांनंतर तो येईल व म्हणेल -' यांना खाऊन टाक' आणि खाल्यानंतर पुत्रवती भव, सौभाग्यवती भव न जाणे काय-काय भव होईल? तर आत्ताच का खाऊ नये? जेव्हा तो येईल तेव्हा दुसरे पाच दाणे देईन. तिने ते पाच दाणे खाऊन टाकले.

तिस-या सूनेला तर किल्ल्यांचा गुच्छा दिसत होता. किल्ल्यांचा गुच्छा पाहिजे. तिने त्या पाच दाण्यांना आपल्या पूजेच्या खोलीत, जिथे देवतांच्या मूर्त्या होत्या, तिथे चांदीच्या डब्बीत ठेवले. रोज ती मूर्त्यांचे दर्शन करायला जायची, पाच दाण्यांनाही पाहायची. चार वर्षांपर्यंत तिने पाच दाण्यांना खूप काळजीपूर्वक जपले.

चौथ्या सूनेने त्या पाच दाण्यांना घेतले, घरामागील जमीन साफ केली आणि त्यांना पेरले. कालांतराने पाच रोपे उगवली, प्रत्येकात शंभरपेक्षा जास्त दाणे होते. दुस-या वर्षी ते सर्व दाणे पुन्हा पेरले आणि तिस-या व चवथ्या वर्षीही. चार वर्षांत मणानी, टनांनी धान्याचे दाणे झाले. भांडार भरले.

जेव्हा म्हातारा परतला तेव्हा प्रत्येक सूनेने आपली गोष्ट सांगितली. चवथीने म्हटले -'महाराज! धान्याचे पाच दाणे अनेक पटीने वाढलेले आहेत. भांडार भरून गेले आहेत. दाणे घेण्यासाठी मजुरांना बोलवावे लागेल'. म्हातारा म्हणाला- 'ही मुलगी कामाची. हिने पाच दाण्यांना सुरक्षितच ठेवले नाही तर ह्यांना कित्येक पटीने वाढवले.'

ह्या म्हाता-यानेही तुम्हाला धर्माचे पाच दाणे दिले आहेत. यांची फक्त रक्षाच करू नका, तर यांना अनेक पटीने वाढवा.खूप संवर्धन करा. मी आपल्यासोबत किल्ल्यांचा गुच्छाही घेऊन जाणार नाही, हा तुमच्याजवळच राहील. प्रत्येकाजवळ आपला-आपला किल्ल्यांचा गुच्छा. धर्मात खूप पक्व व्हा, खूप पक्व व्हा, आणि उघडा दरवाजा. आपल्या आतील स्वर्गीय सुखाचा दरवाजा उघडा. खूप पक्व व्हा, खूप पक्व व्हा, आपल्या आतील ब्राह्मी आनंदाचा दरवाजा उघडा. खूप-खूप पक्व व्हा आपल्या आत निर्वाणिक परम सुखाचा दरवाजा उघडा. किल्ली आपल्याच हातात आहे.

खूप पक्व व्हा, खूप पक्व व्हा धर्मात. खूप मंगल आहे, खूप कल्याण आहे. खूप भाग्याने, मोठ्या पुण्याने प्राप्त होतो धर्म.

सर्वांचे मंगल होवो!

(हा लेख विपश्यनेचे आचार्य श्री विलियम हार्ट ने आपल्या व अनेक साधकांच्या अनुभवांच्या आधारावर लिहीला आहे आणि २२ आक्टोंबरला' विपश्यना न्यूजलेटर' च्या आंतरराष्टीय संस्करण (त्रैमासिक १९७४) मध्ये सचित्र सोळा पानात प्रकाशित झाला. त्यांच्या अनुमतीने ह्याचा मराठी अनुवाद' 'विपश्यना विशोधन विन्यास' द्वारे करण्यात आला आणि भारताच्या मासिक संस्करण' 'विपश्यना' हिंदी, मराठी व 'विपश्यना न्यूजलेटर' इंग्रजीत क्रमश तीन अंकात सचित्र प्रकाशित होत आहे.

## मराठीत ‘विपश्यना पत्रिका’

अनेक साधकांची मागणी आहे की विपश्यना पत्रिका हिंदीप्रमाणेच मराठीतही प्रकाशित व्हावी, ज्यामुळे गावातील लोकांना जास्त लाभ होईल. ह्याबाबत आम्ही सर्व मराठी भाषी साधकांचे विचार जाणून घेऊ इच्छितो. जर आपणास हिंदीऐवजी मराठी पत्रिका पाहिजे असेल, तर कृपया आपले विचार व हिंदी पत्रिकेवर लिहिलेला आपला ग्राहक क्रमांक आणि नाव पोस्टकार्डावर लिहून अथवा ईमेलने त्वरित आम्हाला कळवावे. विपश्यना विशोधन विन्यासचा पूर्ण पत्ता व ईमेल पत्रिकेच्या शेवटी लिहिलेला आहे.(सं)

---0---

## धम्मचक्क, सारनाथ विपश्यना केंद्रात पॅगोडा निर्माण

धम्मचक्क, सारनाथ विपश्यना केंद्रात पॅगोडा निर्माणाची योजना तयार होत आहे. जे कोणी साधक-साधिका ह्या पुण्यार्जनात भागीदार होऊ इच्छित असतील, त्यांनी तेथील व्यवस्थापकाशी संपर्क साधावा.

---0---

### बुद्धपौर्णिमेच्या शुभ प्रसंगी पूज्य माताजींच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

**१८ मे, २०१४, रविवार, वेळ-** सकाळी **११** वाजेपासून दुपारी **४** वाजेपर्यंत, **‘ग्लोबल विपश्यना पॅगोड्यात’**. येथे **३ वाजता दिवंगत गुरुदेवांच्या रेकॉर्डेड प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात.** कृपया खालील फोन नंबरवर अथवा ईमेलने त्वरित संपर्क साधावा. **कृपया बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्क-** फोन नं.: 022-28451170 / 022-33747501- Extn. 9, 022-33747543 / 33747544, (**फोन बुकिंग-** सकाळी ११ ते सायं ५ पर्यंत,रोज)

ईमेलः **Regn: oneday@globalpagoda.org**

**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

## पूज्य गुरुदेवांसोबत धम्म अनुभवाचे क्षण

जर आपले काही प्रेरणास्पद धम्म अनुभव पूज्य गुरुदेवांसोबतचे असतील, अथवा काही प्रेरणास्पद धर्मचर्चा झाली असेल तर कृपया लिहून पाठवावी. निवडलेल्या अनुभवांचा संग्रह पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याची योजना आहे. धन्यवाद !

### समन्वयक आचार्य (एरिया टीचर) (परिवर्तन)

(श्री लक्ष्मीनारायण तोदींच्या खराब स्वास्थ्या मुळे खालील परिवर्तन केले गेलेः—)

१. श्रीमती गीता केडिया-- प. बंगाल, ओरीसा, त्रिपुरा, मिजोरम, आसाम, अरुणाचल प्रदेश व बंगलादेश

### केंद्र आचार्य-परिवर्तन

१. श्रीमती गीता केडिया-- धम्मगङ्गा, कोलकाता, सहायक- श्री विनोद चिरीपाल

२. श्री मोहन देवान-- धम्मपुरी, त्रिपुरा, सहायक- विमलकांति चकमा

### नव नियुक्ती

### सहायक आचार्य

१. कु. बेला वरसानी, राजकोट

२. श्री मधुकर हरिभाऊ लामसे, अमरावती

3. Mrs. Therese Bisson-Rowe, New Zealand

4. Mr. Ramesh Kumar, USA

### बाल-शिबिर शिक्षक

१. श्री मधुकर क्षिरसागर, चंद्रपुर

२. श्रीमती अरुणा निसवदे, गडचिरोली

३. श्रीमती शैला धवले, अमरावती

४. श्रीमती शकुंतला तेलंग, नागपुर

५. श्री सरस्वती नारनवरे, नागपुर

६. श्री पंचम खादीपुरे, नागपुर

७. श्री प्रवीण राउत, नागपुर

८. श्रीमती वीना रामटेके, भंडारा

९. श्री हरिश्चंद्र दहीवाले

१०. श्री संजीव शाहरे, गोंदिया

११. श्री महेंद्रकुमार सोमकुंवर, छिंदवाड़ा

१२. श्री उमेश कुमार चौकीकर, बेतुल

१३. श्री धमपाल तकसांदे, यवतमाल

१४. डॉ. संजय कुसरे, यवतमाल

१५. कु. आशा लौंगानी, जयपुर

१६. श्री अर्जुन, जयपुर

१७-१८. श्री गंगादास व श्रीमती विजया जांभुलकर, भिलाई, छत्तीसगढ़

१९. श्रीमती नीतू रामटेके, बल्लोद, छत्तीसगढ़

२०. श्रीमती पूनम गोयल, देहरादून

२१. श्री मुकेश भारद्वाज, रुड़की

२२. डॉ. सुरेखा सिंह, हरिद्वार

२३. डॉ. दुलाल कांतिदास, कोलकाता

२४. श्रीमती जया मुंसी, कोलकाता

२५. श्री सचिन इनामदार, पुणे

26. Ms Weijun Jian, China

27. Ms Zhang Yan, China

28. Mr MA Dafeng, China

## शिबिर समारोपाच्या पूर्वी पूज्य गुरुदेवांचे कृतज्ञता दर्शविणारे दोहे

नमस्कार आहे बुद्धास, आहे करुणागार।
दु:ख मिटविण्या पथ दिला, सुखी करण संसार।।

नमस्कार आहे धर्मास, आहे पावन पंथ।
ह्या पथावर चाले जो, सहजच बनतो संत।।

नमस्कार हा संघाला, कैसे श्रावक संत।
धर्म धार पावन होय, निर्मळ होय भदंत।।

नमस्कार अरहंताला, नमस्कार सकळ संत।
नमस्कार जननी जनका, उपकार हो अनंत।।

नमस्कार गुरुदेवाला, आहे संत सुजाण।
मोठ्या करुणा चित्ताने, दिले धर्माचे दान।।

असा चाखवी धर्म रस, विषय न घे ओढून।
धर्म सार असाच दिला, टरफल दे काढून।।

रोम रोम ऋणी झाले, ऋण न फेडले जाय।
दुखीस वाटू धर्म सुख, हाची एक उपाय।।

ह्या सेवेच्या पुण्याने, धर्म उजागर होय।
जनांचे हित सुख साधो, सर्वांचे मंगल होय।।

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org